**P.R.O Office ,Crime Branch,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

**प्रेसनोट** **दिनांक – २७/०६/२०२४**

## पिंपरी चिंचवड पोलीसांची संघटीत गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन करण्यासाठी पवार टोळी, राजपुत टोळी, ढमाले टोळी, या टोळयांवर "मोका अंतर्गत कारवाई "

मा.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, श्री. विनय कुमार चौबे यांनी गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देवुन शरिराविरुध्दचे, मालाविरुध्दचे गुन्हे करणारे, खंडणी मागणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **मा.पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०२४ मध्ये आजपावेतो पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील १६ संघटीत गुन्हेगारी टोळयांमधील एकुण ८७ आरोपींवर मोका कायद्यांतर्गत कारवाई केली आहे.**

**१) चाकण पोलीस स्टेशन गु.रजि.नं १९२/२०२४ भादंवि. ३०७,१२० ब, ५०४, ५०६, ३४, आर्म ॲक्ट ३(२५), महा.पो.कायदा कलम ३७(१)(३)१३५** या गुन्हयांचे तपासामध्ये आरोपी नामे १) **राहुल संजय पवार,(टोळी प्रमुख)** वय ३३ वर्षे, रा. म्हाळुंगे इंगळे, ता. खेड, जि.पुणे **२) अजय अरुण गायकवाड,** वय २४ वर्षे, रा. भोसले वस्ती, म्हाळुंगे इंगळे, ता. खेड, जि. पुणे. **३) अमर नामदेव शिंदे** वय ३२ वर्षे, रा. कासार आंबोली, ता. मुळशी, जि. पुणे. **४) अभिजीत ऊर्फ अभि चिंतामण मराठे** रा. कोथरुड, पुणे **५) आशु ऊर्फ आसिफ हैदर हापसी** वय २५ वर्षे, रा. हिंदवी चौक, कासारवाडी, ता. हवेली, जि. पुणे. यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **सदर टोळी प्रमुख व त्याचे साथीदार यांच्यावर एकुण १४ गुन्हे केल्याची नोंद आढळुन आलेली आहे.**

**२) हिंजवडी पोलीस स्टेशन गु.र.नं ४९४/२०२४ भादंवि कलम. ३०८, ३२४, क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ३ व ७** या गुन्हयाचे तपासामध्ये आरोपी नामे **१) सचिन तानाजी राजपुत (टोळी प्रमुख)** वय-२६ वर्षे रा. कासार आंबोली, ता. मुळशी, जि. पुणे, २) अरुण कैलास राजपुत ३) राजेश हरिश्चंद्र राजपुत ४) बालाजी हरिश्चंद्र राजपुत यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **सदर टोळी प्रमुख व त्याचे साथीदार यांच्यावर एकुण ०५ गुन्हे केल्याची नोंद आढळुन आलेली आहे.**

**३) वाकड पोलीस स्टेशन गुरनं ५५४/२०२४ भादवि. ३०२, १२० ब, ३४१, १४३, १४५, १४७, १४८, १४९, आर्म ॲक्ट ४(२५),(२७), महा.पो.का. कलम ३७(१)(३) सह १३५, क्रि.लॉ.ॲमे. ॲक्ट कलम ३ व ७** या गुन्हयाचे तपासामध्ये आरोपी नामे **१) अभिजीत बाजीराव ढमाले, (टोळी प्रमुख)** रा. ढमाले चाळ, जुनी सांगवी, पुणे **२) ऋतिक दिलीप चव्हाण** वय २२ वर्षे, रा. महादेव आळी, हिरा बिल्डींग, जुनी सांगवी **३) प्रेम प्रकाश मोरे** वय १९ वर्षे, रा. ओम कॉम्प्लेक्स शितोळे नगर, पहीला मजला, जुनी सांगवी, पुणे. **४) ओमकार पांडुरंग शेंडगे** वय २२ वर्षे, रा. महात्मा फुले नगर, मराठी शाळेमागे, दापोडी पुणे. **५) दिपक लुंडा कोकाटे** वय २१ वर्षे, रा. मोरया पार्क लेन नं. ०३, रंभा हाईटस, पिंपळे गुरव पुणे. **६) रोशन मुरलीधर सोळंकी** वय २३ वर्षे, रा. सिंधुबाई निवास, ढोरेनगर, लेन नं.१, जुनी सांगवी पुणे. **७) कार्तिक चव्हाण ८) कमलेश पठारे ९) अनिकेत कांबळे १०) गणेश ढमाले ११) निलेश मुदलीयार** यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **सदर टोळी प्रमुख व त्याचे साथीदार यांच्यावर एकुण १७ गुन्हे केल्याची नोंद आढळुन आलेली आहे.**

वरील तिनही **टोळी प्रमुख** यांनी त्यांचे साथीदारांसह अन्य सदस्यांसाठी प्रत्येक गुन्हयात काही सामाईक व काही नवीन साथीदार यांना सोबत घेवुन स्वतःची संघटीत टोळी तयार करुन अवैध मार्गाने आर्थिक फायदा मिळवण्याचे उद्देशाने स्वतःचे गुन्हेगारी टोळीचे वर्चस्व व दहशत प्रस्थापित ठेवण्यासाठी संघटित गुन्हेगारी संघटनेचा प्रमुख म्हणुन किंवा संघटनेच्या वतीने एकटयाने किंवा संयुक्तपणे, हिंसाचाराचा वापर करुन अथवा हिंसाचाराची धमकी देवुन किंवा धाक दपटशहा दाखवुन टोळी प्रमुख व साथीदार यांनी **चाकण, एमआयडीसी भोसरी,रावेत, निगडी, हिंजवडी, वाकड, सांगवी, भोसरी, कोथरुड, पौंड, रोहा, कोलाड रायगड,** पोलीस स्टेशन हद्दीत **खुन करणे, कट रचुन खुन करणे, खुनाचा प्रयत्न, दरोडा,दरोडयाची तयारी, जबरी चोरी, गंभीर दुखापत, दुखापत, खंडणी मागणे, खंडणी साठी पळवुन नेणे, तोडफोड करणे, बेकायदेशि जमाव जमवुन खुनाचा प्रयत्न करणे, जीवे मारण्याची धमकी देणे, बेकायदेशिर अग्निशस्त्रे व हत्यार जवळ बाळगणे,**अशा प्रकारेचे गंभीरे स्वरुपाचे चढत्या क्रमाने गुन्हे दाखल आहेत. प्रत्येक गुन्हा करताना त्यांनी वैयक्तिक व टोळीचे वर्चस्व वाढावे व आर्थिक फायदा व्हावा तसेच जनमाणसात दहशत रहावी हाच उद्देश ठेवुन टोळी प्रमुखाने गुन्हे केलेले आहेत.

सदर टोळीमधील सर्व आरोपी यांनी संघटीत गुन्हेगारी टोळी बनवुन हिंसाचाराचा वापर करुन वर्चस्वासाठी व आर्थिक फायदयासाठी संघटीतपणे गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे विरुध्द महाराष्ट्र संघटीत  गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ अतंर्गत कारवाई करणे बाबत प्रस्ताव पोलीस आयुक्त कार्यालय येथे सादर केला असता सदर प्रस्तावा मधील कागदपत्रांची छाननी करुन नमुद गुन्ह्यांत **महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१) (ii), ३ (४) या कलमांचा अंतर्भाव करण्याचे आदेश मा. श्री.वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड** यांनी पारीत केलेले आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे, मा.अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी, मा.पोलीस उप-आयुक्त श्री.संदिप डोईफोडे (गुन्हे), मा.पोलीस उप-आयुक्त श्री.बापु बांगर (परि-०२) मा.पोलीस उप-आयुक्त श्री.डॉ. शिवाजी पवार (परि-०३)  मा.सहा.पोलीस आयुक्त श्री.विशाल हिरे (गुन्हे), मा.सहा.पोलीस आयुक्त बाळासाहेब कोपनर (गुन्हे -१), यांच्या मार्गदशनाखाली वपोनि श्री.प्रमोद वाघ (चाकण पोस्टे), वपोनि श्री.कन्हैया थोरात (हिंजवडी पोस्टे), वपोनि श्री. निवृत्ती कोल्हाटकर (वाकड पोस्टे), पोलीस निरीक्षक श्री.अनिल देवडे (पी.सी.बी गुन्हे शाखा), पोउपनि श्री.सुहास पाटोळे (वाकड पोस्टे) तसेच पोलीस अंमलदार सपोफौ पारवे, पोशि उभे (हिंजवडी पोस्टे), पोहवा झानंकर (चाकण पोस्टे) पोहवा सचिन चव्हाण, पोहवा व्यंकप्पा कारभारी, पी.सी.बी. गुन्हे शाखा, यांच्या पथकाने केली आहे.

जनसंपर्क अधिकारी
पिंपरी चिंचवड आयुक्तालय